अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

सोमवार, दि. २२ ऑगस्ट २०२२ ▶ वर्ष : २० वे ▶ अंक : ३२३ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

# 'ई-डी' सरकार म्हणजे काळू-बाळूचा तमाशा

✔ सुराज्य/सोलापूर

**शिवसेनेतील फूट. नाराज आमदारांनी हाती घेतला बंडाचा झेंडा. त्यांच्या झेंड्याला भाजपने लावला दांडा. त्यातून झाले सत्तांतर. महाविकास आघाडीचे सरकार गेले अन् बंडखोर एकनाथ शिंदे(ई) आणि भाजपचे देवेंद्र फडणवीस (डी) यांचे 'ई-डी' सरकार आले. हे 'ई-डी' सरकार म्हणजे काळू-बाळूचा तमाशा आहे... अशा शब्दात शिवसेनेचे खा. विनायक राऊत यांनी राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारची खिल्ली उडवली.**

'काय झाडी... काय डोंगार...'फेम शिवसेनेचे बंडखोर आ. शहाजीबापू पाटील यांच्या सांगोला मतदारसंघात रविवारी शिवसेनेने निर्धार मेळावा घेतला. या मेळाव्यात बोलताना खा.राऊत यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर बोचऱ्या शब्दात टीका केली. राऊत म्हणाले की, शिंदे आणि फडणवीस सरकारने मागील सरकारने घेतलेले लोकहिताचे अनेक निर्णय रद्द केले आहेत. दुसरीकडे, हे सरकार काहीही निर्णय घेऊ लागले आहे. त्यामुळे राज्यात काळू-बाळूचा तमाशा सुरू असल्याचा भास होत आहे, अशी टीका करतानाच, जर तुम्हाला शिवसेनेशी गद्दारीच करायची होती तर भाजपमध्ये जायचे होते. मात्र, या लोकांनी आपली आमदारकी विकली, १२ लोकांनी आपली खासदारकी विकली. ४० चोर गेले म्हणजे शिवसेनेचा परिवार संपत नाही, असा प्रहारही खा. राऊत यांनी यावेळी केला.




### शहाजीबापू विनोद करू शकतात..

आ. शहाजीबापू पाटील हा मिमिक्री करणारा माणूस आहे. ते विनोद करू शकतात. त्याशिवाय ते काही करू शकत नाहीत. ज्यांना तमाशा काढायचा आहे, त्यांनी खुशाल त्यांना तमाशात सोंगाड्या म्हणून घेऊन जावे. ते चांगले काम करतील, असा खोचक टोला खा.राऊत यांनी आ.शहाजीबापूंना लगावला.

### दाढीवाला अन् बिनदाढीवाला

महाराष्ट्रात सध्या काळूबाळूचा तमाशा सुरू आहे. एक दाढीवाला आहे, एक बिनदाढीवाला. बिनदाढीवाल्याच्या मनात आले की घेतला माईक. लगेच दाढीवाला पडला उताणा. राष्ट्रगीतासाठी कसे उभे राहावे, हे ज्यांना कळत नाही, असा मुख्यमंत्री महाराष्ट्राला मिळावा, हे आपलं दुर्दैव आहे, अशी खंतही खा. राऊत यांनी यावेळी बोलून दाखवली.

### मोदी पर्व संपले...

मुंबईत भाजपच्या कार्यकर्ता मेळाव्यात देवेंद्र फडणवीस यांना बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मुंबईत मनपावर भाजपचा झेंडा फडकवायचा आहे; असे म्हटले. याचा अर्थ ते आता बाळासाहेबांच्या नावावर मते मागत आहेत. कारण मोदी पर्व संपले आहे. आता मोदींच्या नावावर मते मिळणार नाहीत, हे कळले तेव्हा बाळासाहेबांच्या नावावर मते मागणे सुरू झाले आहे. अशा भडभुंच्या लोकांना राज्यातली जनता माफ करणार नाही, अशी टीका त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केली.

### मोडीत निघालेली भांडी



गेल्या महिनाभरापासून माझ्यावर टीका करण्यासाठी 'मातोश्री'कडून शोध सुरू होता. तसा कोणी सापडला नसल्यामुळे काही गुंडप्रवृत्तीच्या लोकांना आज सांगोल्यात पाठवले होते. ती मोडीत निघालेली भांडी आहेत. त्यांना कोणी विचारत नाही. सध्या त्यांनाही सुगीचे दिवस आल्यामुळे ती बडबडताहेत. त्यांच्याकडे लक्ष देण्याची गरज नाही.

- **शहाजीबापू पाटील** (शिवसेनेचे बंडखोर आमदार)

---

#### तांबडेवाडी येथे मोटारीतून आलेल्या

## दरोडेखोरांनी डोळ्यात चटणी टाकून २५ हजारांचा माल पळविला

✔ **सोलापूर** : गाडीला कट का मारली अशी विचारणा करीत मोटारीतून आलेल्या चौंघा दरोडेखोरांनी अंगावर चटणी टाकून २५ हजाराचा माल लुटून नेला. ही घटना तांबडेवाडी (ता.बार्शी) येथे शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

यासंदर्भात भरत दशरथ माने (रा.केज जि.बीड) यांनी बार्शी तालुका पोलिसात फिर्याद दाखल. केली ते आणि त्यांचे दोघे मित्र असे कराड येथील साखर कारखान्यात जाऊन परत आपल्या गावाकडे बोलेरो मोटारीतून निघाले होते. सायंकाळी सात वाजेच्या सुमारास तांबडेवाडी पाटी जवळ त्यांची बोलोरो आली असता पाठीमागून पांढऱ्या रंगाच्या मोटारीतून आलेल्या दरोडेखोरांनी त्यांची मोटार अडवली. आणि तू आम्हाला कट का मारला, असे म्हणत काचेवर अंडी फेकले. त्यानंतर तिघांच्या डोळ्यात तिखट फेकून त्यांच्या जवळील मोबाईल आणि इतर कागदपत्रे असा २५ हजाराचा माल लुटून पोबारा केला. अशी नोंद बार्शी तालुका पोलिसात झाली.


## एमपीएससी परीक्षेला १,७५६ उमेदवारांची दांडी

### १४ केंद्रांवर ४ हजार १०३ उमेदवारांनी हजेरी लावल

✔ सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीने (एमपीएससी) उपजिल्हाधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार, शिक्षणाधिकारी या गट अ संवर्गातील व सहायक गटविकास अधिकारी, उपशिक्षणाधिकारी या गट ब संवर्गातील पदांच्या ५०१ जागांसाठी रविवारी घेण्यात आलेल्या पूर्व परीक्षेला सोलापूर शहरातील विविध १४ केंद्रांवर सकाळच्या सत्रात ४ हजार १०३ उमेदवारांनी हजेरी लावली तर १ हजार ७५६ उमेदवारांनी दांडी मारली. सकाळी दहा ते बारा व दुपारी तीन ते पाच या वेळेत दोन सत्रात ही परीक्षा घेण्यात आली. दुपारच्या सत्रात ४ हजार ८४ जणांनी हजेरी लावली तर १ हजार ७७५ जणांनी पाठ फिरविली. संगमेश्वर कॉलेज, श्री सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक, श्री सिध्देश्वर कन्या प्रशाला, संभाजीराव शिंदे प्रशाला, जैन गुरुकुल, एसव्हीसीएस अक्कलकोट रोड व भवानी पेठ, अण्णप्पा काडादी हायस्कूल, श्राविका हायस्कूल, हरिभाई देवकरण प्रशाला, सेंट जोसेफ हायस्कूल, मॉडर्न हायस्कूल, शांती इंग्लिश स्कूल आदी केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी विशेष भरारी पथकासह एक निरीक्षक, चार समन्वयक, १३० पर्यवेक्षक व ३५२ समीक्षक असे एकूण सहाशे कर्मचारी सज्ज होते

MPSC



## मारहाण केल्याच्या राग धरून आत्महत्येचा प्रयत्न

### नान्नज येथील घटना

✔ सुराज्य/सोलापूर



पैशाच्या वादातून मारहाण केल्याच्या राग करून एका ३२ वर्षीय युवकाने विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना नान्नज (ता.उत्तर सोलापूर) येथे आज रविवारी सकाळच्या सुमारास घडली.

तानाजी शिवाजी गवळी (वय ३२ रा. नान्नज) असे वीष प्राशन केलेल्या युवकाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात राम मुळे (मित्र) यांनी दाखल केले. तानाजी गवळी हे आज सकाळी शेतात काम करीत होते. त्यावेळी जुन्या पैशाच्या व्यवहारातून अनिल मुळे त्यांची पत्नी आणि मुलगा या तिघांनी मारहाण केली होती. त्याचा राग धरून त्याने विष प्राशन केले. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

---

## मुख्यमंत्री नितीश कुमारांच्या ताफ्यावर दगडफेक



### दगडफेकीत काही लोक जखमी झाले

तरुणाच्या हत्येमुळे संतप्त झालेल्या लोकांनी पाटणा-गया मुख्य मार्गावर मृतदेह ठेवून रास्ता रोको केला. याच निदर्शनादरम्यान नितीश कूम यांच्या ताफ्यातील गाड्या रस्त्यावरून जाऊ लागल्याने संतप्त ग्रामस्थांनी ताफ्यावर दगडफेक केली. त्यामुळे अनेक वाहनांच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या. दगडफेकीमुळे काही जण जखमीही झाले आहेत.

✔ **बिहार** : बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या ताफ्यावर दगडफेक करण्यात आल्याची बातमी समोर येत आहे. या दगडफेकित काही वाहनांच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या आहेत. दगडफेकिच्या वेळी मुख्यमंत्री नितीश ताफ्यात नव्हते. या घटनेबाबत अधिकाऱ्यांनी सांगितले की, ही घटना बिहारमधील पाटणा जिल्ह्यातील गौरीचक पोलिस स्टेशनच्या सोहगी गावात घडली. जिथे काही अज्ञात लोकांनी त्याच्या ताफ्यावर दगडफेक केली.

या ताफ्यात मुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेले सुरक्षा कर्मचारीच उपस्थित होते. सोमवारी नितीश कुमार बिहार जिल्ह्यातील गया येथे जाणार आहेत. मुख्यमंत्री हेलिकॉप्टरने गयाला जाणार आहेत, पण हेलिपॅडवरून इतर ठिकाणी पोहोचण्यासाठी त्यांची गाडी पाटणाहून गयाला पाठवली जात होती.

## भाडे मागितल्याने काठी आणि दगडाने मारहाण

▶ **महिलांसह तिघे जखमी; हुलजंती येथील दिवसा घडलेला प्रकार**

✔ **सोलापूर** : दुकानाचे भाडे मागण्यास गेल्यानंतर काठी दगड आणि हाताने केलेल्या मारहाणीत दोन महिलांसह तिघेजण जखमी झाले. ही घटना हुलजंती (ता.मंगळवेढा) येथील चौकात आज रविवारी सकाळच्या सुमारास घडली. सुगलाबाई व्यंकण्णा रोकडे (वय ६८ रा. चिंचपाडा,मुंबई), महेश अंकुश बोरकडे (वय २३) आणि सीताबाई आनंदा बोरकडे (वय ६९ दोघे रा.हुलजंती) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना मंगळवेढा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

गावातील चौकात असलेल्या दुकानाचे भाडे मागण्यास ते गेले होते. त्यावेळी उमेश मुकुंदा काटे,धर्मा बोरकडे युवराज बोरकडे आणि सुनील बोरकडे या चौघांनी मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## राज्यातील सत्तासंघर्षाची सुनावणी पुन्हा लांबणीवर

### मंगळवारी सुनावणी होण्याची शक्यता

### निवडणूक आयोगाचीही २३ ऑगस्टपर्यंत मुदत

शिवसेना कुणाची या मुद्द्यावर आता निवडणूक आयोगातही कार्यवाही सुरु झाली आहे. कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी उद्धव ठाकरे गटानं चार आठवड्यांचा वेळ मागितला होता. पण आयोगानं दोन आठवड्यांचाच वेळ दिला आहे. याची मुदत २३ ऑगस्ट असून सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी देखील २३ ऑगस्ट रोजी होण्याची शक्यता आहे.

✔ **मुंबई** : राज्यातील सत्तासंघर्षावर सर्वोच्च न्यायालयात उद्या होणारी सुनावणी पुन्हा लांबणीवर गेली आहे. आता ही सुनावणी मंगळवारी होण्याची शक्यता आहे. न्यायालयातील त्रिसदस्यीय खंडपीठातले एक न्यायमूर्ती उद्या उपलब्ध नसल्यामुळे ही सुनावणी लांबणीवर गेली आहे. त्यामुळे आता यावर मंगळवारी सुनावणी होते का हे पाहावं लागेल.

या आधी राज्यातील सत्ता संघर्षाच्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात ४ ऑगस्टला शेवटची सुनावणी झाली होती. त्यानंतर आता तिसऱ्यांदा ही सुनावणी पुढे गेली आहे. पण यामुळे शिवसेनेसमोर एक अडचण निर्माण होऊ शकते. केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेनेला पक्ष आणि चिन्हासंबंधी त्यांचं मत मांडण्यासाठी २३ ऑगस्ट ही तारीख दिली होती. सरन्यायाधीश एस व्ही रमणा हे या २६ ऑगस्ट रोजी निवृत्त होत आहेत. त्यांच्या जागी महाराष्ट्राचेच उदय लळित हे सरन्यायाधीश होणार आहेत. त्यामुळे सरन्यायाधीश रमणा यांच्या निवृत्तीपूर्वी महाराष्ट्रातील सत्ता संघर्षाचा निकाल लागणार की नाही, हे अद्याप स्पष्ट नाही.

---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




आकार नक्की वाढतो !

## मतदान ओळखपत्राला आधार क्रमांक जोडणी करा : जिल्हाधिकारी

✔ सुराज्य/सोलापूर

मतदान ओळखपत्राशी आधार कार्ड संलग्न करण्यासाठी विशेष मोहीम १ ऑगस्ट २०२२ पासून राबविण्यात येत आहे. जास्तीत जास्त मतदारांनी या प्रक्रियेत सहभाग नोंदवून आधार क्रमांक मतदान ओळखपत्राशी जोडून घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा नि सांगोला आणि मंगळवेढा तालुका दौरा केला.

सांगोला तालुक्यातील वाकी, घेरडी येथील मतदान केंद्राना भेटी देवून पाहणी केली. पंचायत समिती सभागृहात केंद्रस्तरीय अधिकारी



(बीएलओ) यांची आढावा बैठक घेतली. आधारकार्ड मतदान ओळखपत्राशी जोडण्याची मोहीम प्रभावीपणे राबवून १० दिवसात काम संपविण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी तहसीलदार अभिजित पाटील उपस्थित होते.

तर मंगळवेढा तालुक्यातील पाटखळ, गोणेवाडी, शिरसी येथील मतदान केंद्राना भेटी देवून माहिती घेतली. तसेच १५०० पेक्षा जास्त मतदार असलेल्या न्यू इंग्लिश स्कूल आणि नगरपालिका शाळेतील मतदान केंद्राची पाहणी करून मतदार संख्या कमी करण्याविषयी सूचना केल्या. यावेळी प्रांतधिकारी गजानन गुरव, तहसीलदार सुशील बेल्हेकर, तहसीलदार स्वप्नील रावडे उपस्थित होते.

मतदाराकडे आधार क्रमांक नसल्यास नमुना क्र. ६ ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांना मनरेगा जॉब कार्ड, फोटोसहित किसान पासबुक, आरोग्य स्मार्ट कार्ड, वाहन परवाना, पॅनकार्ड, पासपोर्ट, फोटोसहित पेन्शन कागदपत्रे, केंद्र आणि राज्य शासन कर्मचाऱ्याचे ओळखपत्र, सामाजिक न्याय विभागाकडील ओळखपत्र पैंकी कोणताही एक दस्तावेज सादर करता येईल.

आधार कार्डावरील क्रमांक गुप्त ठेवता येणार आहे आधार क्रमांक नमूद केलेले प्रत्यक्ष आणि संगणकीकृत दस्तावेज दुहेरी कुलूपबंद ठेवले जातील आणि आधार क्रमांकाची गोपनीयता अबाधित ठेवण्यासाठी आधार कार्डावरील क्रमांक लपविण्याची तरतूद केली असल्याचे जिल्हाधिकारी शंभरकर यांनी सांगितले.